ISSN 2230-7850 Impact Factor : 4.1625 (UIF) Volume - 6 | Issue - 6 | July - 2016

Indian Streams Research Journal
International Recognized Multidisciplinary Research Journal
ISSN No : 2230-7850 Impact Factor : 4.1625 (UIF) [Yr. 2016]

ISRJ Indian Streams Research Journal

# महामंङ्गल सुत्त : एक आढावा व निर्मिती प्रवास!

डॉ. संदेश वाघ
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रस्तावना :**

बुद्धत्वाच्या साक्षात्कारानंतर स्वतः तथागत भगवान बुद्धांनी समस्त मानवकल्याणार्थ 'धम्मचक्कप्पवत्तनाय' केले आणि बुद्धत्व ज्ञान जगाला प्राप्त झाले. भगवान तथागत बुद्धांचा पहिला धम्मोपदेश हा पंचवग्गिय भिक्खुसंध महानाम, कौण्डिण्य, वप्प, भद्दिय आणि आश्वजित यांना देण्यात आला.




पुढे अनेक लोकांनी श्रावक स्वरूपात बुद्धांचा उपदेश ग्रहण केलेला आपणास बोद्ध साहित्यात दिसून येते. भगवान तथागतांनी मानव कल्याणासाठी केलेला संपूर्ण 'धम्मोपदेश' हा तीन विभागात संग्रहीत करण्यात आला आहे. त्याला तीन पेटारे 'प्रिष्टिक' असे म्हणतात. तीन विभागात विभागलेले विस्तीर्ण बौद्ध साहित्य आपणास दिसून येते. त्या तीन प्रमुख विभागास विनय पिटक, सुत्तपिटक व अभिधम्म पिटक असे म्हणतात. सुत्तपिटकामध्ये तथागत बुद्धांच्या संपूर्ण सुत्र उपदेशाचा संग्रह करण्यात आलेला आहे. ८४००० सुत्त संग्रहाचा उपदेश 'सुत्तपिटक' या महान ग्रंथामध्ये समाविष्ट करण्यात आलेला आहे.

तथागत बुद्धांचे पट्टशिष्य भदन्त आनंद यांनी पहिल्या धम्म संगिनीमध्ये बुद्धांच्या द्वारा वदम्यात आलेल्या सुत्ताला ५०० अरहंत भिक्खुसंघासमोर कथन केले आहे ४००० सुत्तातील काही निवडक सुत्त उपदेश दैनंदिन जीवन व्यवहारामध्ये 'मार्गदर्शिका' म्हणून कार्य करतात. अशा महत्वपूर्ण सुत्तापैकी 'महामंङ्गल' या उपदेश सुत्तांचा आपण आढावा घेणार आहोत.

मानवाच्या दैनंदिन जीवन व्यवहारात महामंङ्गल सुत्ताचे महत्त्व या विश्लेषणातून समजून घेण्यास मदत होणार आहे. विश्लेषण :

यं मङ्गल द्वादसहि चिन्तसिंसु सदेवका ।
सोत्सानं नाधिगच्छन्ति अट्ठतिसञ्च मङ्गल ।
देसितं देवदेवेन सब्ब पाप विनासनं ।।
सब्ब लोक-हित त्यात मङ्गलं व भणामहे ।।

वरील पालि गाथेचा स्पष्ट करून झाल्यानंतर आपणास माहामंगल सुत्ताचा अर्थ आणि महत्व या दोन्ही बाबी समजतील. महामंगल सुत्ताद्वारे भगवान बुद्धांनी ३८ गाथांचा उपदेश केला आहे. प्रत्ये गाथा ही मार्गदर्शक स्वरूपात काम करते. ३८ उत्तम मंगळाचा मार्ग शोधून काढण्यासाठी अनेक महान पुरुष आणि देवता जवळ-जवळ १२ वर्षे प्रयत्नशील होते. या १२ वर्षाच्या कालखंडात त्यांना महान उत्तम मंगलाचा मार्ग शोधताच आला नाही. महान उत्तमस्वरूपाचा मंगल स्वरूपाचा योग्य मार्ग त्यांना प्राप्त झाला नाही. तोच महान उत्तमाचा महामंगल मार्ग स्वतःबुद्धांनी शोधून काढला. त्या महान मार्गास सर्व महापुरुष देव-देवितांनी सर्व विनाशकारी पापांचा नाश करणारा मार्ग म्हणून वाखणण्यात आले. बुद्धांनी निसर्गाप्रती अगाध मैत्री करून लोकांच्या हितासाठी कल्याणासाठी महामंगल सुत्ताचा उपदेश सांगितल्याचे आपणास बौद्धइतिहास साहित्यामध्ये आपणास दिसते.

महामंगल सुत्ताचा उपदेश बुद्धांनी ज्यावेळेस दिला तेव्हा तो उपदे. ऐकण्यासाठी पुज्य भदन्त आनंद स्थवीर तेथे उपदेश श्रावक म्हणून उपस्थित होते. ३८ गाथांचा महान उत्तम मंगलाचा मार्ग आनंदानी प्रत्यक्ष स्वरूपात ऐकला असल्यामुळे २५६२ वर्षापूर्वी झालेल्या पहिल्याच धम्म संगितीमध्ये त्यांनी हजारो सुत्ताचा संग्रह केला. त्यापैकी अनेक अंगानी महत्वपूर्ण असलेले मंहामंगल सुत्त सुद्धा पूज्य आनंद यांनी पुनःश्च एकदा संग्रहीत केले. गुरू-शिष्य परंपरेच्या महान थेरवादी परंपरेत 'महामङ्गल' सुत्तास अनन्यासाधारण असे महत्व आहे. या सुत्तास कथन करताना पूज्य भन्ते आनंद यांनी कोणते कथन केले ते प्रथम आपण पाहुयात....

**पालि :**

एवं मे सुत्तं । एकं समयं भगवान सावत्थियं विहरति
जेतवने अनाथपिण्डिकस्स आरामे ।
अथ खो अञ्ञतरा देवता अभिकान्ताय
रत्तिय अभिक्कन्तवण्या केवलप्पं
जेतवण्णं आभासेत्वा येन भगवा तं नपुसंकमि ।
उपसंकमित्वा भगवन्तं अभिवादेत्वा
एकमन्तं अट्ठासी । एकमंत्तं हिता खो सा ।

देवता भगवन्तं गाथाय अज्झमासिवरील पालि गाथांचा अर्थ स्पष्टपणे समजून घेतल्यानंतर आपल्या लक्षात येते की, पूज्य भदन्त आनंद हे बौद्धसाहित्याशी किती निर्मळ आणि प्रामाणिक होते. त्यांनी प्रत्येक सुत्ताचा प्रारंभ करतांना नेहमिच म्हटले आहे. ऐवं मे सुत्तं । असे मी ऐकले आहे. याचा । अर्थ असा होतो की, आनंदानी आपल्या ज्ञानाने काही कथन करतो असा उल्लेख करण्याऐवजी एकदा असे मी बुद्धाद्वारे ऐकले मी पुण्हते महान सत्य महामंगलसुत्त स्वरूपात तुमच्या समोर कथन करीत आहे. वरील सुत्ताचा उपदेश करताना । आनंदाच्या प्रथम कथनांतून आपल्या लक्षात येते की, त्यांनी प्रत्येक सुत्त हे कुठे? कधी? कुणासाठी? आणि कोणता उपदेश? या बाबींचा प्रामुख्याने प्रथम कथनात उल्लेख केलेला दिसतो.

महामंङ्गल सुत्त सुद्धा अशाच कथनाने आनंद यांनी प्रारंभित केले होते. ते म्हणतात, असे मी ऐकले होते, एकेकाळी भगवान श्रावस्ती येथे जेत्वनात अनाथपिण्डिकाच्या आरामात रहात होते. तेव्हा रात्र संपत आली असता एक अत्यंत सुंदर देवता सर्व जेतवन प्रकाशमान करून जेथे भगवान होते. तेथील जागेत आली. तेथे येवून भगवान तथागत बुद्धांना नमस्कार करून एका बाजूस उभी राहिली. एका बाजूस उभी राहून ती देवता भगवान बुद्धास गाथा स्वरूपात म्हणाली,

वरील पालि गाथेच्या स्पष्टीकरणावरून आपल्या लक्षात येते की, प्रत्येक सत्ताचा बुद्ध उपदेश पण्हः एकदा कथन करतांना भन्ते आनंद यांनी उपदेशाचा विषय जागा, व्यक्ती आणि त्याचे महत्व जगाला सागितले आहे. महामंगल सुत्ताचा उपदेश. ऐकण्यासाठी सामान्य लोकांबरोबर देवता ह्यांना सुद्धा स्थान आहे. देवता सहित मानवाच्या कल्याणाचा मार्ग म्हणून 'बुद्धांनी अडतीस मंगलाचा उपदेश करून उपकृत करावे असा महान प्रश्न देवतांनिच बुद्धांस विचारला होता. हा उपदेश देताना बुद्ध श्रावस्ती येथील अनाथपिडिक नावाच्या व्यापारी यांच्याकडून निर्माण करण्यास आलेल्या. जेत्वन' विहारात वास्तव्यास होते. या संपूर्ण कथनातून आपणास विषयांची सत्यता समजून घेण्यास मोलाची मदत होते. महामङ्गलाचा उपदेश म्हणजे चमत्कारिक व अनाकलणीय अशी कोणती मनोरम कल्पना नाही तर ती एक बुद्धसहवासात घडलेली एक सत्य घटना आहे.

भगवान बुद्धास कोणीतरी प्रश्न विचारला व त्यास उत्तर म्हणून बुद्धांनी केलेले उपदेश हे पुढे सुत्त स्वरूपात आपल्या सर्वांना मार्गदर्शक बुद्ध म्हणून काम करू लागले. महामंगल सुत्ताचा उपदेश समजून घेण्यासाठी आलेल्या देवतेने बुद्धांनी गाथा स्वरूपात विचारलेल्या प्रश्नाचा आपण थोडक्यात आढावा घेऊ.

''बहु देवा मनुस्साच, मङ्गलानि अचिन्तुय ।
अक्खंगमाना सोत्यानं, ब्रुहि मङ्गलमूत्तमं ।।''

वरील पालि गाथेतून आपणास स्पष्टपणे दिसते की, हा उपदेश देण्याच्या अगोदर विश्वातील देवता आणि सामान्य जनता यांना उत्तम मंगलाचा महान मार्ग ज्ञात नव्हता. बुद्धांना प्रश्न विचारतांना देवता आपली भावना व्यक्त करतात की, अनेक देवता आणि सामान्य मनुष्यांनी सुख प्राप्त व्हावे या करीता उत्तम मंगलाची कल्पना केली. परंतु अनेक वर्षापासून या महान सत्याचा आम्हाला उलगडा झाला नाही. कृपा करून भगवान तथागत बुद्धांनी अनेक वर्षापासून या महान सत्याचा आम्हाला उलगडा झाला नाही. कृपाकरून भगवान तथागत बुद्धंनी अनंत अनुकंपा करून आम्हास त्या महान सत्यास उत्तम मंगल स्वरूपात आम्हास सांगावे.

देवतासमान सत्पुरुषांनी केलेली याचना बुद्धांनी स्विकारली आणि जमलेल्या सर्व देव-देविता व लोकांना ३८ गाथांचा मंगल उत्तम मार्गाचा उपदेश केला. ३८ गावांपैकी १२ गाथा ह्या विशेष स्वरूपात देवता आणि माणसांना सुख प्राप्त करणारा उत्तम मंगल मार्ग बुद्धांनी उपदेशित केला.

**उपसंहार :**

संपूर्ण महामंगल सुत्ताचा अभ्यास केल्यानंतर आपल्या लक्षात येते की, स्वयं बुद्धांनी महामंगल सुत्तास देवता आणि पुरुष व सामान्य जन यांच्या नैतिकता व शुद्धाचरण करण्याचा महान मार्ग म्हणून उपदेश केला. ३८ गाथांचा हा उपदेश आहे. तर त्यापैकी १२ मंगल सुत्तमार्ग हे दैनंदिन जीवन व्यवहारातील तर उर्वरित २६ गाथा व मंगले हे गृहत्याग करून जीवन जगण्याल्या भिक्खु भिक्खुणी संघाच्या कल्याणाचा मार्ग म्हणून आपल्या लक्षात येते.

**संदर्भसाधने :-**


१) भदन्त तिरुसवंस; बौद्ध धम्म ग्रंथ : त्रिपिटक सार सुत्तपिटक, अनुपम तुलसी पगारे, नागपूर, २००६, पृ.क्र. २०,२१.
२) सांकृत्यायन राहूल, अनुवाद, इ.मो. नारनवरे, संकेत प्रकाशन, नागपूर, २००७, पृ.क्र. १५.
३) भदन्त तिस्सवंस, बौद्ध धम्मग्रंथ सार त्रिपिटक, उपरोक्त, पृ.क्र. ५१.
४) भदन्त धम्मसेवकजी, बौद्ध संस्कार, त्रिरत्न प्रकाशन, मुळावा, १९८९, पृ.क्र. ३७.
५) कांबळे सविता, बुद्धवंस, सुगत प्रकाशन, नागपूर, १७ सप्टेंबर २०११, पृ.क्र. ११.
६) अविनाश सहस्त्रबुद्धे, भगवान बुद्धांचा जनवादी धर्म, लोकवाङ्मय गृह प्रकाशन, २००५, पृ.क्र. ६१.
७) भदन्त तिस्सवंस, मुत्तपिटक, उपरोक्त, पृ.क्र. ४३.
8) भदन्त खेमधम्मो, बुद्ध-ज्ञान, त्रिरत्न प्रकाशन, मुळावा, २०००, बुद्ध पौर्णिमा, पृ.क्र. ३८.
9) सूर्यकान्त भगत, डॉ. राजेंद्र भस्मे (अनुवादक), धम्मपद, सुचिर प्रकाशन वर्धा, ६ मे २०१२, पृ.क्र. ४०.